| MHAK090016732022 | दाखल तारीख | : | ०६.१०.२०२२ | | |
|---|---|---|---|---|---|
| | नोंदणी तारीख | : | ०६.१०.२०२२ | | |
| | निकाल तारीख | : | २१.०५.२०२५ | | |
| | कालावधी | | ०२ | ०७ | १५ |
| | | | व | म | दि |

**मुर्तिजापूर येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी आर. आर. पकडे )**
(निकाल तारीख २१.०५.२०२५)

**सं.फौ.ख.क्र.८४०/२०२२**
**निशाणी – १७**

प्रथम खबर बाबत तपशील
अपराध क्रमांक : २२२/२०२२
पोलीस ठाणे : माना, जि. अकोला

| | | |
|---|---|---|
| **अभियोगपक्ष** | : | महाराष्ट्र सरकार<br>प्रभारी अधिकारी<br>माना पोलीस ठाणे यांचे मार्फत |
| अभियोपक्षातर्फे विधीज्ञ | : | श्री आर. एस. पाटील सहायक लोकअभियोक्ता |
| **आरोपी** | : | **देवराव संपत ढाकरे,**<br>वय : ५७ वर्ष, व्यवसाय– मजुरी,<br>रा. सोनोरी, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला. |
| आरोपींतर्फे विधीज्ञ | : | श्री एन. बी. सुसतकर |

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | ०७.०९.२०२२ |
| प्रथम खबरीची तारीख | ०७.०९.२०२२ |
| दोषारोप पत्र दाखल तारीख | ०९.०९.२०२२ |
| गुन्हाचा तपशील निश्चीतीची तारीख | २१.१०.२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १७.०२.२०२५ |
| न्यायनिर्णयाकरीता राखीव ठेवलेली तारीख | २१.०५.२०२५ |
| निकालाची तारीख | २१.०५.२०२५ |
| शिक्षेची तारीख, जर दिली असेल तर | लागु नाही. |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप | दोषी अथवा निर्दोष मुक्तता | शिक्षेबाबत विवरण | न्यायाधीन बंदी म्हणुन संपरीक्षे दरम्यान भोगलेला कारावास फौ.प्र.सं.कलम ४२८ करीता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **देवराव संपत ढाकरे** | समजपत्रावर सोडले | ०७.०९.२०२२ | ६५–ई म.प्रो. ॲक्ट | निर्दोष मुक्तता | लागु नाही. | लागु नाही |

## अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयामार्फत तपासलेल्या साक्षदाराची यादी.

**अ. अभियोगपक्षाचे साक्षदार :**

| क्रमांक | नाव | साक्षदाराचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र.१ | सलिम शाह बाबा शाह, नि.११ | घटनास्थळ व जप्ती पंच |
| सा.क्र.२ | सोपान उध्धव काळे, नि.१४ | घटनास्थळ व जप्ती पंच |

**ब. बचावपक्षाचे साक्षदार :**

| क्रमांक | नाव | साक्षदाराचा प्रकार |
|---|---|---|
| साक्षदार तपासलेले नाहीत. | | |

**क. न्यायालयाचे साक्षदार :**

| क्रमांक | नाव | साक्षदाराचा प्रकार |
|---|---|---|
| साक्षदार तपासलेले नाहीत. | | |

## अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालय यांच्या निशाण्या.

**अ. अभियोगपक्षाच्या निशाण्या :**

| क्रमांक | निशाणी | विवरण |
|---|---|---|
| १ | निशाणी क्र. १२ व १३, सा.क्र.१ | घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील सही |
| २ | निशाणी क्र. १५ व १६, सा.क्र.२ | घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील सही |

**ब. बचावपक्षाच्या निशाण्या :**

| क्रमांक | निशाणी | विवरण |
|---|---|---|
| काही नाही. | | |

**क. न्यायालयाच्या निशाण्या :**

| क्रमांक | निशाणी | विवरण |
|---|---|---|
| १ | नि.१० | गुन्हाचा तपशिल व प्ली |

## न्या य नि र्ण य

(दिनांक २१.०५.२०२५ रोजी घोषित)

आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५–ई अन्वये दोषारोप दाखल करण्यात आले असून त्याचे विरुध्द सदर खटला चालविण्यात आलेला आहे.

२. अभियोगपक्षाची हकीकत अशी आहे की, पो.हे.कॉ. पंजाब इंगळे ब.नं. ९८९ पो.कॉ. १४१९ सह पेट्रोलिंग तसेच प्रो रेड कामी गेले असता ग्राम सोनोरी येथे जि.प. शाहा जवळ गुप्त बातमीदाराकडून बातमी मिळाली की, ग्राम सोनोरी येथे राहणारा देवराव ढाकरे हा त्याचे राहते घरी देशी दारू कॉर्टर बाळगुन त्याची विक्री करत आहे, अशा खात्रीलायक माहिती मिळाल्याने जप्ती पंचनाम्यातील नमुद पंचांना बोलावून माहिती दिली व पंचण् ते व सोबत पो. स्टाफ पो.कॉ. १४१९ असे १६.१५ वाजता ग्राम सोनोरी येथील देवराव ढाकरे याचे पुर्व मुखी घरी जावुन आवाज दिला असता तो घरी हजर मिळून आला त्याला त्याचे घराची देशी दारू बाबत घर झडतीचे कारण सांगितले असता, त्याने संमती दर्शविल्याने त्याचे पुर्व मुखी घरामध्ये पहिल्या खोलीत लाकडाचे पलंगाखाली एक नॉयलॉन थैलीमध्ये ०८ नग देशी दारूने भरलेले सिलबंद कॉर्टर प्रत्येकी १८० एम.एल. मापाचे पंचासमक्ष मिळून आले. त्याबाबत त्यास देशी दारू बाळगण्या बाबत परवाना विचारला असता, त्याने नकार दिल्यावरून सदर इसमास पंचासमक्ष त्याचे नाव गाव विचारले असता, त्याने त्याचे नाव देवराव संपत ढाकरे, वय–५७ वर्षे, रा. सोनोरी असे सांगितले. खात्री पटल्याने सदरचे ८ नग देशी दारूचे सिलबंद कॉर्टर किंमत अंदाजे ४८०/– चे पंचासमक्ष जप्ती पंचनाम्याप्रमाणे आरोपी देवराव संपतराव ढाकरे रा. सोनोरी याचेकडून जप्त करून ताब्यात घेतले. जप्त मुद्देमालापैकी एक सिलबंद देशी दारू कॉर्टर १८० मी.ली. चे देशी दारूने भरलेले वेगळे काढून त्यावर त्यांचे, पो.स्टाफ, पंचांच्या व आरोपीच्या सहीनिशी कागदी लेबल लावून घटनास्थळी लाखेने सिल केले. सदर सी.ए. सॅम्पल करीता राखून ठेवले. आरोपीचे सदर कृत्य कलम ६५ ई महा. दारूबंदी कायद्याचे प्रमाणे असल्याने फिर्याद दाखल केली.

३. सदर घटनेबाबत फिर्यादी पो.हे.कॉ. पंजाब इंगळे ब.नं. ९८९ यांनी पोलीस स्टेशन माना, ता. मुर्तिजापूर येथे रिपोर्ट दिला. त्यानुसार अपराध क्रमांक २२२/२०२२ दाखल झाला.

४. पो.हे.कॉ. पंजाब इंगळे ब.नं. ९८९ यांनी सदर गुन्हयाचा तपास केला. त्यांनी साक्षीदारांकडे तपास करुन त्यांचे जबाब नोंदविले. तसेच त्यांनी तपासादरम्यान घटनास्थळाचा पंचनामा व जप्ती पंचनामा तयार केला. तपासाअंती माना पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांनी प्रस्तुत आरोपींविरुद्ध दोषारोप पत्र दाखल केले.

५. प्रस्तुत आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५–ई अन्वये गुन्हयाचा तपशील निशाणी १० कडे ठेवला. आरोपीने गुन्हा कबूल न करता संपरिक्षेची मागणी केली. अभियोग पक्षाने दोन साक्षीदार/घटनास्थळ व जप्ती पंच तपासले. त्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा नि.क्र.१ वर आदेश करुन बंद करण्यात आला. आरोपीविरूद्ध कोणताही

गुन्हादर्शक पुरावा न आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आले नाही.

**६.** सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीचे वकील यांचा युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले.

**७.** वादप्रश्न व त्यावरील निष्कर्ष हे कारणमीमांसे सह खालील प्रमाणे आहेत–

| अ. क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय, दि.०७.०९.२०२२ रोजी सोनोरी, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला येथे आरोपीच्या ताब्यात अवैधरित्या विनापरवाना देशी दारुचे प्रत्येकी १८० मि.ली. चे ८ कॉर्टर विक्रीकरीता बाळगतांना मिळुन आला व त्याअर्थी आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी कायद्याच्या कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केला? | **नाही.** |
| २. | आदेश काय ? | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>वादप्रश्न क्र. १ करिता</u> :**

**८.** आरोपीवरील आरोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने दोन साक्षीदार तपासले. सा.क्र.१ सलिम शाह बाबा शाह व सा.क्र.२ सोपान उध्धव काळे हे दोन्ही पंच साक्षीदार असून त्यांनी त्यांच्या साक्षीत कथन केले आहे की, ते आरोपीस ओळखतात. दि.०७.०९.२०२२ रोजी पोलीसांनी त्यांना आरोपीच्या राहत्या घरी ग्राम सोनोरी येथे पंचनाम्यासाठी बोलाविले नव्हते. तसेच त्यांच्या समक्ष घटनास्थळ व जप्त पंचनामे तयार केले नव्हते. त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील त्यांची सह्या मान्य केल्या, परंतु त्यातील मजकूर मात्र माहिती नसल्याचे कबुल केले. दोन्ही साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने अभियोग पक्षाद्वारे त्यांचा उलटतपास घेतला असता अभियोग पक्षास पुरक असे कोणतेही कथन वदविता आले नाही.

**९.** दोन्ही पंच साक्षीदारांनी अभियोग पक्षास सहकार्य न केल्यामुळे, घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिद्ध होवू शकला नाही. त्यामुळे मुळात फिर्याद सिध्द झालेली नाही. सदर कामी अभियोग पक्षाने जप्त मुद्देमालाचा सी.ए. अहवाल पुरेशी संधी असतानाही अभिलेखावर दाखल केलेला नाही. घटनास्थळ व जप्ती पंचांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. तसेच या कामी तपास अधिकारी यांना तपासलेले नाही. त्यामुळे नि.१ वर आदेश करून अभियोग पक्षाचा

पुरावा बंद करण्यात आला. त्यामुळे घटनास्थळावरून जप्त केलेला मुद्देमाल ही देशी दारू होती ही बाब सिध्द होत नाही.

१०. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाला आरोपीच्या ताब्यात अवैधरित्या दारु असल्याचे सिध्द करणे जरुरीचे आहे. अभियोग पक्षास रासायनिक विश्लेषण अहवालाद्वारे आरोपीकडून जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा दारुच असल्याचे सिध्द करणे जरुरीचे आहे. जप्त केलेला मुद्देमाल आणि विश्लेषित मुद्देमाल यांचा संबंधसुध्दा प्रस्थापित करणे आवश्यक आहे. जप्त केलेल्या दारुच्या क्वार्टरमधुन एक क्वार्टर वेगळा काढुन नमुना म्हणून रासायनिक विश्लेषण अहवाल प्राप्ती करीता पाठविण्यात आल्याचे सिध्द करणे आवश्यक आहे. सदरहू प्रकरणात अभियोग पक्षास संधी देवूनही रासायनिक विश्लेषण अहवाल न्यायालयास प्राप्त झाला नाही. इतर आवश्यक गोष्टी सुध्दा न्यायालयासमक्ष सिध्द झालेल्या नाहीत. तसेच तपासण्यात आलेले पंच साक्षीदार यांनी सुध्दा अभियोग पक्षाच्या हकीकतीस दुजोरा दिला नाही. करीता अभियोग पक्ष आरोपीच्या ताब्यात ८ देशी दारुचे कॉर्टर ज्यात देशी दारु होती व त्या अवैधरित्या बाळगुन असल्याचे सिध्द करु शकला नाही. करीता मुद्दा क्र.१ यास नकारार्थी निष्कर्ष नोंदवुन मुद्दा क्र.२ संदर्भात खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| १ | आरोपी **देवराव संपतराव ढाकरे** यांना महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) नुसार शिक्षापात्र असलेल्या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५(१) नुसार निर्दोष सोडण्यात येत आहे. |
| २ | आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जमीन कदबे रद्द करण्यात येतात व त्याने जमानतीसाठी न्यायालयात रक्कम भरली असल्यास ती त्याला अपील कालावधीनंतर परत करण्यात यावी. |
| ३ | प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्येमाल देशी दारुच्या १८० मि.ली. क्षमतेच्या ८ सिलबंद कॉर्टर अपील कालावधी नंतर निरिक्षक राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडे विल्हेवाटीसाठी पाठविण्यात यावे. |
| ४ | आरोपीने फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ४३७अ अन्वये प्रत्येकी रक्कम रु. १५,०००/- च्या जामीनाची पुर्तता करावी.<br>(न्यायानिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आले.) |

RADHARAMAN RAMDAS PAKADE

Digitally signed by RADHARAMAN RAMDAS PAKADE
Date: 2025.05.22 15:27:29 +0530

ठिकाण: मुर्तिजापूर
दि. २१.०५.२०२५

आर. आर. पकडे
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.२) मुर्तिजापूर.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | S. R. Adhau |
| Name of the Court | Jt. Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Murtizapur. |
| Date of judgment/order | 21.05.2025 |
| Signed by Presiding Officer on | 21.05.2025 |
| Judgment/order uploaded on | 23.05.2025 |